पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०२९, दि.२०/०९/२०१९**

**स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे**
**हरवलेली पर्स परत मिळवुन दिलेबाबत.**

दिनांक १६/०९/२०१९ रोजी महीला जयश्री उपेंद्र शिंदे, रा.गणेशपेठ, पुणे यांची पैसे व कागदपत्रे असलेली पर्स रिक्षा क्रमांक एमएच १२ जेएस ६८२१ या रिक्षामध्ये विसरली होती. सदर रिक्षाचे चालक दत्तात्रय शिंदे रा.मुकुंदनगर, स्वारगेट, पुणे यांनी सदरची पर्स महर्षीनगर चौकी येथे घेऊन आले. पोलीस चौकीचे ड्युटी अंमलदार ३९०८ सकट यांनी सदर पर्समधील कागदपत्राचे आधारे जयश्री शिंदे यांचा शोध घेतला. त्या मिळुन आल्याने त्यांची हरवलेली पर्स महर्षीनगर चौकी येथे रिक्षाचालक दत्तात्रय शिंदे यांचे हस्ते पोलीस हवालदार सकट यांनी परत केली. महिला नामे जयश्री उपेंद्र शिंदे, रा.गणेशपेठ, पुणे यांनी रिक्षाचालक शिंदे व पोलीस हवालदार ३९०८ सकट यांचे आभार मानले.